**महाराष्ट्र जनशक्ती** ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १५ वे | दिनांक : ०३/०१/२०२६ | वार : शनिवार

## सूर्याजी पिसाळ जसा लक्षात राहिला तसा मिंधे लक्षात राहील : उद्धव ठाकरे



**मुंबई** : जशी लढाई मुघलांबरोबर झाली तशीच लढाई मुंबई महानगरपालिकेची आहे. सूर्याजी पिसाळ जसा ४०० वर्षे लक्षात राहिला तसा मिंधे लक्षात राहील, असा खोचक टोला शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर लगावला आहे. उमेदवारांना मार्गदर्शन करताना उद्धव ठाकरेंनी शिंदेंसह पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर निशाणा साधला.

उद्धव ठाकरे म्हणाले, जशी लढाई मुघलांबरोबर झाली तशीच लढाई मुंबई महानगरपालिकेची आहे. सूर्याजी पिसाळ सारखा गद्दारीचा टिळा ४०० वर्ष झाली तरी मिटला नाही तर या गद्दारांचे काय? सूर्याजी पिसाळ जसा ४०० वर्षे लक्षात राहिला तसा मिंधे लक्षात राहील, असा हल्लाबोल ठाकरेंनी केला.

दोन गुजरात्यांच्या हातात आपल्याला मुंबई द्यायची नाही, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यावर निशाणा साधला. तसेच आपण मनाने काम करावे, समोरून धनाचा वर्षाव मोठ्या प्रमाणावर होणार आहे. एकही जागा नतद्रष्टांच्या हाती द्यायची नाही. तसेच जे आता इथे आले आहेत ते सर्व निवडून आले पाहिजेत, असेही ठाकरेंनी म्हटले.

दरम्यान, दादर येथील शिवसेना भवनात आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे यांनी संयुक्तपणे महानगरपालिका उमेदवारांसमोर एक महत्त्वाचे प्रेझेंटेशन सादर केले, ज्यामध्ये सत्ता आल्यास मुंबईच्या विकासासाठी नेमके काय करायचे, याबाबतचा सविस्तर आराखडा मांडण्यात आला. हे प्रेझेंटेशन आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्याकडे अंतिम मंजुरीसाठी सादर केले जाणार असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक सुधारणा करून लवकरच मुंबईकरांसाठीचा अधिकृत 'वचननामा' जाहीर केला जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

महापालिकेच्या मालकीची जमीन खासगी विकासकांच्या घशात न घालता तिथे मुंबईकरांची सोय करणाऱ्या शासकीय, महापालिका, बेस्ट आणि पोलिस कर्मचाऱ्यांना तसेच गिरणी कामगारांना हक्काची घरे देणार. तसेच मुंबई महापालिकेचे स्वतःचे गृहनिर्माण प्राधिकरण असेल. इतकेच नव्हे तर पुढील ५ वर्षात १ लाख मुंबईकरांना परवडणारी घरे दिली जातील, अशी आश्वासने आदित्य ठाकरे तसेच अमित ठाकरे यांनी दिली आहेत. शिवसेना आणि मनसे यांच्या वचननाम्यात मुंबईकरांसाठी काय आहे.




## दलित साहित्य भारतीय साहित्य विश्वाचा भक्कम आधारस्तंभ : लेखिका मृदुला गर्ग यांचे प्रतिपादन




साहित्यिक क्षेत्रातील सर्वात मोठी क्रांती म्हणजे दलित साहित्याची निर्मिती होय. मराठी साहित्य हे इतर भारतीय भाषांच्या तुलनेत नेहमीच अग्रस्थानी राहिले आहे. भारतीय भाषांमध्ये दलित साहित्य पहिल्यांदा मराठी भाषेतच लिहिले गेले. मराठी दलित साहित्यातूनच इतर भाषिक साहित्यिकांनी दलित लेखनाची प्रेरणा घेत, त्यांच्या मार्गाने जात आपल्या भाषांमध्ये दलित साहित्याची निर्मिती केली. त्यामुळे मराठी साहित्यातील दलित साहित्य हा भारतीय साहित्य विश्वाचा भक्कम आधारस्तंभ ठरला आहे, असे प्रतिपादन देशपातळीरील ज्येष्ठ लेखिका, विचारवंत डॉ. मृदुला गर्ग यांनी केले. आपले बहुभाषिक संस्कृतीचे वैभव पाहताना असे लक्षात येते की, अनेक हिंदी लेखकांनी मराठी, बंगाली, उडिया आणि इतर भारतीय भाषांमधील साहित्यकृतींमधून प्रेरणा घेतली आहे. ही बहुभाषिक संपन्नता सर्वच प्रकारच्या लेखकांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे, असेही त्यांनी यावेळी आवर्जून नमूद केले.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या 99व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन आज (दि. 2) डॉ. मृदुला गर्ग यांच्या हस्ते झाले. त्या वेळी त्या बोलत होत्या.

मराठी साहित्याशी असलेले माझे भावनिक नाते कधीच ओसरलेले नाही तर काळाच्या ओघात ते अधिकच गडद होत गेले, असे सांगून डॉ. मृदुला गर्ग म्हणाल्या, मी वाचलेले पहिले मराठी पुस्तक म्हणजे शिवाजी सावंत यांची 'मृत्युंजय' ही कादंबरी. या कादंबरीचा मी हिंदी अनुवाद वाचला होता. महाभारतातील 'कर्ण' हा माझा आवडता नायक असल्यामुळे हे पुस्तक वाचणे हा माझ्यासाठी अत्यंत भावूक आणि समृद्ध करणारा अनुभव ठरला. या नंतर छत्रपती संभाजी महाराज यांच्यावरील 'छावा' ही कादंबरी देखील मी वाचली.

त्यानंतर ज्या लेखकाने माझ्या विचारांना पूर्णपणे कवेत घेतले, ते म्हणजे दलित साहित्यातील बंडखोर व्यक्ती नामदेव ढसाळ. "तुमच्या कवितेत केवळ राग आणि विद्रोहच का असतो?" या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले होते, "माझे कार्य लास्याचे नव्हे तर तांडवाचे सूर आळवते." त्यांचे हे शब्द माझ्या मनात आणि हृदयात खोलवर रुजले. 1980 पासून मी त्यांचे साहित्य आणि त्यांच्याबद्दल सातत्याने वाचत आले आहे. ते एक श्रेष्ठ कवी, लेखक आणि मानवी हक्कांचे पुरस्कर्ते होते. जातिभेद नष्ट करण्यासाठी आणि दलित अस्मिता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी 'दलित पँथर' ही लढाऊ संघटना उभी केली. 2014 पर्यंत ते सामाजिक कार्यात सक्रिय राहिले. त्यांच्या कवितांचा दिलीप चित्रे यांनी केलेला इंग्रजी अनुवाद 'अ करंट ऑफ ब्लड' ('A Current of Blood') मी वाचला आहे. तो चळवळीतील सर्वच कर्त्यांसाठी 'बायबल' ठरला. त्यांच्या पत्नी मलिका अमर शेख या सुद्धा तितक्याच प्रतिभावंत लेखिका आणि दलित साहित्यातील पहिल्या महिला कवींपैकी एक आहेत.

नादमेव ढसाळ यांच्या दलित साहित्याविषयीची आठवण सांगताना मृदुला गर्ग म्हणाल्या, माझ्या नातीने अमेरिकेतील 'स्क्रिप्स' (SCRIPPS) कॉलेजमध्ये 'विद्रोही मौखिक कविता' ('Speaking Poetry') या विषयावर लिखाण करताना तिच्या प्रबंधात नामदेव ढसाळ यांच्या 'अ करंट ऑफ ब्लड'मधील कवितांचा समावेश केला. या वेळी फक्त अमेरिकन कवींचेच संदर्भ द्यायला हवेत, असे प्राध्यापकांनी सांगितल्यानंतर तिने ठामपणे उत्तर दिले की, "नामदेव ढसाळ आणि मलिका अमर शेख यांच्यासारख्या मराठी दलित कवींच्या उल्लेखाशिवाय 'विद्रोही कवितेचा' इतिहास अपूर्ण आहे." शोषितांच्या आणि स्त्रीवाद्यांच्या लढ्यासाठी तिने दिलेली ही एक मोठी साक्ष होती. उर्मिला पवार आणि शरणकुमार लिंबाळे यांसारख्या इतरही दिग्गज दलित लेखकांची आत्मचरित्रे मला भावली आहेत आणि त्यांना भेटण्याचा योगही आला आहे. एकाही स्त्री पात्राशिवाय असलेली भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' ही कादंबरी देखील मी वाचली आहे. त्या कादंबरीने मला अक्षरश: खिळवून ठेवले. लेखकाची सर्जनशीलता ही स्त्री-पुरुष असा भेद न करता प्रकट होऊ शकते हे मला यातूनच पटले. नेमाडे यांची ज्ञानपीठ विजेती महागाथा 'हिंदू' ही देखील मी वाचली आहे.

मृदुला गर्ग म्हणाल्या, अनेक मराठी नाटककारांच्या कलाकृतींनीही मला प्रभावित केले आहे. यातील महत्वाचे नाव म्हणजे विजय तेंडुलकर. 'शांतता! कोर्ट चालू आहे' आणि 'सखाराम बाईंडर' ही नाटके विद्रोह आणि प्रस्थापितांविरोधी विचार मांडताना दिसतात. महेश एलकुंचवार हे माझे सर्वात आवडते नाटककार आहेत. त्यांच्या नाटकांची व्याप्ती अफाट आहे. पुरुष असो वा स्त्री, मानवी दु:खाप्रती असलेली त्यांची सखोल सहानुभूती मला सर्वात जास्त आकर्षित करते. यात 'यातनाघर', 'वासनाकांड', 'पार्टी', 'वाडा चिरेबंदी', 'प्रतिबिंब' आणि 'सोनाटा' यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

मला एक गोष्ट मान्य करावी लागेल की, नाट्यक्षेत्रातही हिंदीला अजून बराच लांबचा पल्ला गाठायचा आहे. मराठी आणि बांगला रंगभूमी आजही आम्हा हिंदी भाषिकांना प्रेरणा आणि आनंद देत असते. त्यांच्या प्रभावामुळेच आम्ही अर्थपूर्णतेने रंगभूमीकडे वळत आहोत.

आजचे संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांच्या 'झाडाझडती' या कादंबरीचा इंग्रजी अनुवादही मी वाचला आहे. या कादंबरीत धरणग्रस्त आणि विकास प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या सामान्य लोकांच्या संघर्षावर भाष्य करण्यात आले आहे. जमिनी, घरे आणि उपजीविका गमावलेल्या सामान्यांची व्यथा यात मांडली आहे. सामाजिक आणि साहित्यिक दृष्टीने पाहता, 'झाडाझडती' ही एका बिगर-दलित लेखकाने लिहिलेली असली, तरी ती कुठल्याही दलित साहित्याइतकीच निर्भीड आणि विद्रोही आहे.

विश्वास पाटील यांच्या 'द ग्रेट कांचना सर्कस' या कादंबरीमधून सर्कसमधील जीवन, त्यातील प्राणी आणि जीवावर उदार होऊन खेळ करणारे कलाकार यांचा त्यांनी केलेला अभ्यास थक्क करणारा आहे. प्रकाशकांच्या विनंतीवरून मला या कादंबरीच्या हिंदी अनुवादाची प्रस्तावना लिहिण्याची संधी मिळाली. त्या कादंबरीने मला जो अनुभव दिला, तो शब्दात मांडताना मला मनस्वी आनंद झाला आहे, असे त्या म्हणाल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३ जानेवारी २०२६


# तरवडी हे सत्यशोधक पत्रकारितेचे केंद्र व्हावे : डॉ. सुधीर तांबे




**तरवडी (ता. नेवासा) :** सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांच्या कार्यामुळे तरवडी हे गाव केवळ भौगोलिक ओळखीपुरते मर्यादित न राहता सत्यशोधक पत्रकारितेचे केंद्र म्हणून ओळखले जावे, असे प्रतिपादन विधान परिषदेचे सदस्य मा. डॉ. सुधीरजी तांबे यांनी केले.सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांच्या १४० व्या जयंतीनिमित्त दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समिती, तरवडी यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय साहित्य व पत्रकारिता पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर, साहित्यिक, पत्रकार व अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.डॉ. तांबे पुढे म्हणाले की, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांनी सुरू केलेले 'दीनमित्र' हे वृत्तपत्र केवळ बातम्यांचे माध्यम नव्हते, तर ते शोषित, वंचित व बहुजन समाजाच्या प्रश्नांसाठी लढणारे वैचारिक अस्त्र होते. आजही निर्भीड, विवेकनिष्ठ आणि समाजाभिमुख पत्रकारितेची नितांत गरज असून, त्या दृष्टीने तरवडीसारख्या ठिकाणी पत्रकारिता प्रशिक्षण व संशोधनाचे केंद्र उभारले गेले पाहिजे.या समारंभात 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील वैचारिक साहित्य पुरस्कार 'मराठा विरुद्ध ओबीसी : प्रस्थापितांचे राजकारण' या ग्रंथासाठी प्रा. सुदाम चिंचाणे आणि डॉ. प्रभाकर गायकवाड यांना प्रदान करण्यात आला. पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी श्री. विश्वनाथ पाटील यांना पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. साहित्य विभागातील पुरस्कारांमध्ये कादंबरी विभागात 'बे दुणे शून्य' साठी श्री. रविंद्र रेखा गुरव, कथा विभागात 'आमचं मत आम्हालाच' साठी श्री. माधव जाधव, काव्य विभागात 'जमिनदार सुटलेला काळ घोडा' साठी श्री. धनाजी घोरपडे, चरित्र विभागात 'सबकू सलाम बोलो' साठी श्री. गजानन देशमुख, ललित लेखन विभागात 'लोकधर्म' साठी डॉ. संजय बोरणे आणि समीक्षा विभागात 'चित्र कोमल समीक्षेचे प्रकरण' साठी श्री. राजेंद्र सलालकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. विशेष पुरस्कार 'मायबोली रंग कथांचे' हा श्री. सचिन पाटील यांना देण्यात आला. यावेळी पुरस्कारार्थीमधून डॉ. प्रभाकर गायकवाड आणि विश्वनाथ पाटील यांनी मनोगते व्यक्त केली.या सर्व पुरस्कारांचे वितरण मा. डॉ. सुधीरजी तांबे यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. आ. डॉ. नरेंद्र घुले पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. भाऊसाहेब जाधव (माजी उपजिल्हाधिकारी, संभाजीनगर), मा. श्री. संपतराव शिंदे (पोलीस उपायुक्त), श्री. सुधीर लंके (पत्रकार), श्री. भूषण देशमुख, डॉ. अशोक ढगे, काशिनाथराव नवले, डॉ. रामदास भोग, साळुबा पांडव आणि डॉ. यशवंत सोळुंके आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समिती, तरवडी यांनी केले होते. समितीचे उपाध्यक्ष को. बाबा आरगडे आणि सचिव श्री. उत्तमराव पाटील यांनी संयोजनाची जबाबदारी सांभाळली. प्रास्ताविक डॉ. सुधाकर शेलार यांनी केले, तर आभार यशवंत पाटील यांनी मानले.

# श्रीक्षेत्र देवगिरी ते शिर्डी पायी दीडी रवाना



**दौलताबाद (जावेद अहमद) :** सालाबाद प्रमाणे यावर्षी ही दौलताबाद ते शिर्डी पायी दिंडी वर्ष १५ वेदिंडी चालक रामदास इंगळे यांच्या नेतृत्वाखाली दि ०२ शुक्रवारी रोजी सकाळी दहा वाजता रवाना करण्यात आली ऐतिहासिक दौलताबाद किल्या पासून मिरवणूक सुरवात होऊन बसस्थानक येथे ग्रामस्थानी साई प्रतिमेला पुष्प व आरती करून रवाना केली या पायी दिंडीत जवळपास २०० भाविक सामील झाले आहेत.महिलांनी ढोल ताश्याच्या गजरात फुगडी खेळत खेळा मेळाच्या वातावरणात सहभाग नोंदवला. महिला फुगळी खेळत असताना अनेक विदेशी पर्यटक फोटो काढत होते.यावेळी सर्व समाजातील बांधव माजी सरपंच उषाताई कांजूने,सय्यद हारुन, संजय कांजूणे,दतोपंत सुराशे, ह भ प परमेश्वर महाराज कोरडे, हभ प बाबासाहेब महाराज आनंदे,सय्यद शेरु, किशोर जाधव, संदीप शेळके, रामदास इंगळे, देवीदास इंगळे, विलास इंगळे,गणेश इंगळे,नरू बळी, कल्याण काजुने,राजेंद्र खण्डगळे, ज्ञानेश्वर गवळी, विशंभर आनंदे हे उपस्थित होते

# स. भु. मध्ये स्नेहल कुलकर्णी यांचे कथाकथन रंगले



**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील श्री सरस्वती भुवन प्रशालेच्या पूर्व माध्यमिक विभागात निवेदिका, कथाकथनकार स्नेहल कुलकर्णी यांचे कथाकथन रंगले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ होते. याप्रसंगी व्यासपीठावर पर्यवेक्षक विजय चापाईतकर, विनोद सिनकर, अंजली कोलते आदींची उपस्थिती होती. साने गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर मुख्याध्यापक विश्वरूप आणि निकुंभ यांनी कथामालेचे महत्त्व विशद करून शुभेच्छा दिल्या. कथामालेचे द्वितीय पुष्प गुंफताना स्नेहल कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, सुसंगती, संकटाला भिऊन न जाता सामोरे जाणे, शौर्य आदी मूल्यसंस्कार असलेल्या गोष्टी त्यांनी मुलांना सांगितल्या. कथाकथनानंतर त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना उत्तरे येणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तके भेट म्हणून दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कथामाला विभागाचे विनोद सिनकर यांनी केले. सूत्रसंचालन कु. स्रग्वी पाठक या विद्यार्थिनीने केले, तर आभार प्रदर्शन अंजली कोलते यांनी केले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३ जानेवारी २०२६


## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात; लक्झरी बस पेटली, चालकाचा होरपळून मृत्यू, २१ जखमी



**दौलताबाद (जावेद अहमद) :** मुंबई नागपूर समृद्धी महामार्गावर लासुर जवळ चेनल क्र ४६३.५ येथे मुंबई कडून मलकापूर कडे जाणारी लक्झरी बस क्र MH - १९ -CX- ३०१५ प्रवासी घेऊन जात असताना पुढे जाणारे ट्रक क्र CG- ०४ -M - ८७११ हा पुढे जात होते ट्रक चालकाने अचानक ब्रेक दाबल्याने चालकाला अंदाज न आल्याने समोरील ट्रॅक ला जाऊन पाठीमागून धडकले. धडक दिल्यानंतर ट्रक हे निघून गेले व ट्रॅव्हलने पेट घेतला त्यात संपूर्ण trave l बस ला आग लागली. प्रवासी हे खिडक्या दरवाजातून बाहेर निघाले त्यात काही प्रवासी हे जखमी झाले. तसेच travel चालक हे आग जास्त असल्याने travel मधेच जळून मयत झाले. प्रवासी यांना AMBULANCE ने घाटी दवाखाना छत्रपती संभाजीनगर येथे रवाना करण्यात आले. ट्रॅव्हल हे क्रेनच्या साहाय्याने बाजूला घेण्यात आले असून वाहतूक सुरळीत चालू आहे.चालक अमोल शेलकर वय - ३५ वर्ष रा. पुणे जखमींचे नाव पार्थ पवार, नजमा शेख, योगेश, अश्विनी, सुशील पांडे, राज पवार, निखिल राठोड, महेश शेळके, केतकी देशपांडे, विवेक जाधव, वंदना जाधव, शिवम कोरडे, शेख नोमान, कमलेश बिल्लारे, मयूर कटकामवर, आयुक कटकमवर, सपना राऊत, अनिल बोरकर, शिवम इंगळे, गौतम गवई क्लिनर, गणेश नरोटे चालक घटनास्थळी रुपाली दरेकर पोलीस अधीक्षक महामार्ग पोलीस छत्रपती संभाजीनगर, किशोर चौधरी पोलीस निरीक्षक मोहन चव्हाण उपनिरीक्षक मोहन चव्हाण, पोलीस अंमलदार Hc/१३४९, Hc/४२ गरड, पोशी/८१३ पचोळे सोबत ६ MSF जवान यांनी घटनास्थळी धाव घेत जखमी ला मदत केलीसदर घटनेची नोंद शिलेगाव पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली आहे पुढील तपास पोलीस करत आहे

## जालना झोन आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या संघाला उपविजेतेपद



**जालना :** मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड येथे झालेल्या जालना झोन आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या संघाने उपविजेतेपद पटकाविले. या संघात कर्णधार निखिल सुरसे, अद्वैत भोसले, आदित्य काळे, शिवम ढेम्पे, प्रेम मेहमी, आदित्य करवंदे, महेश पुरी, कार्तिक पवार, रोहित स्वामी, श्रावण राठोड, यश जाधव, अभय पंगुळवाले, यशराज बायस व क्षितिज दिवे या खेळाडूंचा समावेश होता. हा संघ दिनांक ८ जानेवारी पासून बीड येथे होणाऱ्या विभागीय आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत सहभागी होणार आहे. या यशाबद्दल महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री. सुरेशजी अग्रवाल व श्री. अरुणजी अग्रवाल यांनी संघाचे कौतुक केले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. कविता प्राशर, डॉ. भूषण नाफडे, क्रीडा संचालक डॉ. भिकूलाल सले, क्रीडा समिती सदस्य डॉ. रवींद्र शिंपी, डॉ. कुणाल देशपांडे व प्रा. अभिषेक ढेंबरे हे उपस्थित होते.

## वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी पुस्तकांशी मैत्री करा !



**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा ग्रंथालय विभागाच्यावतीने दि. ०१ - ०२ जानेवारी २०२६ रोजी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयात भव्य ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले. यावेळी भारतीय ग्रंथपालनशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांना अभिवादन करण्यात आले. या ग्रंथप्रदर्शनाचे उदघाटन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर,गढी चे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी केले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे, प्रा.डॉ. सुनील जाधव ,प्रा.सोमनाथ घाडगे हे उपस्थित होते तर महाविद्यालयीन समिती सदस्य ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे, प्रा. डॉ. वंदन जाधव, प्रा. बापू घोक्षे, अंतर्गत मूल्यमापन समितीचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक, रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.लोखंडे बंडू, प्रा. डॉ.शिवाजी काकडे, कनिष्ट विभाग प्रमुख प्रा. प्रकाश नाईकवाडे, प्रा. सतीश जरांगे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे यांनी ग्रंथप्रदर्शनामागील भूमिका स्पष्ट केली. 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या मोहिमेद्वारे महाविद्यालयात एक समृद्ध वाचन संस्कृती रुजवून, विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना देणे आणि त्यांना ज्ञानाधिष्ठित समाजाचे जबाबदार घटक बनवणे, हे या उपक्रमाचे मूळ उद्दिष्ट आहे असे सांगितले. उद्घाटनाप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. विश्वास कदम म्हणाले कि, आजच्या डिजिटल आणि वेगवान युगात युवा पिढीचा कल पुस्तकांपेक्षा स्क्रीनकडे अधिक वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांना दर्जेदार साहित्याची प्रत्यक्ष ओळख करून देऊन त्यांच्यात वाचनाची अभिरुची पुन्हा निर्माण करणे तसेच पुस्तके ही केवळ माहितीची साधने नसून ती विद्यार्थ्यांची वैचारिक प्रगल्भता आणि चरित्र घडवणारे सच्चे मित्र आहेत. या ग्रंथ प्रदर्शनात वाचनीय पुस्तके, विविध संदर्भग्रंथ, कथा, कादंबरी ठेवण्यात आले होते. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयातील ग्रंथसंपदा वाचकांना उपलब्ध करून देण्यात आली. सदर वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत ०१ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन पंधरवडा राबविण्यात येणार असून या उपक्रमाच्या माध्यमातून प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा, सामुहिक वाचन, वाचन संवाद, वाचन कौशल्य कार्यशाळा यासारखे अनेक उपक्रम या दरम्यान घेण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ अशोक देवगुडे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. प्रा. लोखंडे बंडू यांनी मानले. या ग्रंथप्रदर्शनात सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर वृंद, विद्यार्थी तसेच वाचकांनी आपला सहभाग नोंदवला.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३ जानेवारी २०२६

## कवी अय्युब पठाण यांच्या "मर्मगंध " कविता संग्रहाला साहित्य पुरस्कार जाहीर






**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** प्रसिद्ध साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांच्या "मर्मगंध" या प्रौढ कविता संग्रहाला बुलढाणा जिल्हयातील साखखेर्डा येथील दैनिक भारत संग्राम यांच्यावतीने २०२६ चा स्वर्गीय मधुकर खंडारे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ व सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त दिला जाणारा उकृष्ट मराठी कवितासंग्रह साहित्य पुरस्कार यंदा अय्युब पठाण लोहगावकर यांच्या "मर्मगंध" या प्रौढ कविता संग्रहाला नुकताच जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, रोख रक्कम असे आहे. लवकरच पठाण यांना पुरस्काराच्या कार्यक्रमात बुलढाणा येथे वितरण सोहळयात या साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. असे बुलढाणा येथील दैनिक भारत संग्रामचे संपादक श्री. खंदारे यांनी अय्युब पठाण यांना मोबाईलद्वारे कळविले आहे. हा साहित्य पुरस्कार जाहीर झाल्याने अय्युब पठाण यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## माळीवाडा येथे शेतकऱ्याच्या मुलांना नोकरी लावण्याचे आमिष देऊन दोन कोटी पाच लाख रुपयांची फसवणूक

**दौलताबाद (जावेद अहमद) :** आर्थिक गुन्हा शाखेचे अर्ज चौकशी करून वरिष्ठ अधिकारी यांच्या आदेशानुसारदौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये चौघा विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आलेसूर्यभान रंगनाथ पल्हाळ वय ६७ वर्षे राहणार माळीवाडा छत्रपती संभाजीनगर यांनी दि ०१ जानेवारी गुरुवारी दौलताबाद पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केली आहे कीअनिल अमरचंद साकला मंजीत नगर जालना रोड छत्रपती संभाजीनगर,शेख मोहम्मद खालेद शेख मोहम्मद हनीफ बारुदगरनाला छत्रपती संभाजीनगर, जीलानी मुसा निजामधोंगडे, वरिष्ठ लिपीक, विद्युत निरीक्षक विभाग, शिवाजी नगर, छत्रपती संभाजीनगर, आदमखान अहमदखान सुकेडे रा- अजिंठा जि छत्रपती संभाजीनगर या चौघांनी अंदाजे मार्च २०१९ पासून ऑगस्ट २०२३ दरम्यान माळीवाडा येथे फसवणूक केली आहेसूर्यभान यांची या चौघा सोबत एकमेकांशी ओळख असल्याने व चौघांनी सूर्यभान यांना समृध्दी महामार्गात गेलेल्या जमीनीचे दहा ते अकरा कोटी मिळुन देण्याचे व सूर्यभान यांच्या दोन मुलांना आरोग्यविभागात व एका मुलास रेल्वे विभागात नोकरी लावुन देतो असे सांगुन वरील कालावधीत त्यांचे विश्वास संपादन करुन, विश्वास घात करुन रुपये चार लाख RTGS द्वारे व रुपये दोन कोटी एक लाख रोख असे एकुण 2,05,00,000/- ( दोन कोटी पाच लाख) रुपयांची फसवणुक केली असल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वाघ हे करत आहे

## रायगड (कोलाड) येथे होणाऱ्या 'आपदा मित्र' कॅम्पसाठी शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची निवड




**कन्नड :** महाराष्ट्र शासन, छत्रपती संभाजी नगर जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने `आपदा मित्र`१० दिवसीय कॅम्प रायगड येथे दिनांक २ जानेवारी २०२६ लासुरू होणार आहे. शिवाजी महाविद्याल कन्नडच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील १७ स्वयंसेवकाची निवड झाली आहे. तरी या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विजय भोसले, उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब मगर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश महाजन, डॉ. राकेश अहिरराव डॉ. सीमा काशीद, प्रा. प्रगती चव्हाण, प्रा. सोमेश मोगरे, प्रा.फड यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## साहित्य सखा राज्यस्तरीय काव्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून डॉ प्रभाकर शेळके यांची निवड



**जालना :** जिल्ह्यातील कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके यांची उद्घाटक म्हणून निवड उजळंबा जि परभणी येथे राज्यस्तरीय साहित्य सखा काव्य संमेलनासाठी जालना जिल्ह्याचा हा साहित्य सन्मान आहे परभणी येथील मुख्य संयोजक उध्दव परभणीकर, प्रा डॉ प्रल्हाद भोपे यांनी निमंत्रण पत्र पाठविले आहे. या यशाबद्दल मसाप कार्यवाह डॉ दादा गोरे ख्यातनाम चित्रकार श्रीधर अंभोरे, पंढरीनाथ सारके, डॉ विजयकुमार कुमठेकर, राम गायकवाड कवी कैलास भाले, सुहास सदावर्ते प्रा राजेंद्र भोसले, सुनील लोणकर, सुहास पोद्दार, राजेंद्र देशमुख, सय्यद चांद, सय्यद शफीक, विठ्ठल टेपले, संपादक संतोष तांबे, भीमराव रोडे, प्रा.जालिंदर बटूळे, अनिरुद्ध पावसे, प्रल्हाद रोडे, श्रीराम गावंडे, इ. मान्यवरांनी अभिनंदन केले.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३ जानेवारी २०२६


## शिक्षणमहर्षी तात्यारावजी मोरे वादविवाद स्पर्धेत दयानंद विधी महाविद्यालय लातूरचा संघ प्रथम



**मुरुम (प्रा. सुधीर पचंगल्ले)** :कृत्रिम बुद्धिमत्ता मानवाची शिकण्याची पद्धत बदलत असून वैयक्तिक गरजांनुसार उपयोग करणे शक्य करते आहे. यामुळे शिक्षण अधिक सुलभ, वेगवान आणि सर्वसमावेशक बनत असले तरी मानवाचा बौद्धिक विकास, विचारशक्तीचा समतोल राखण्यासंबद्धी आव्हाने उभी करत आहे. मात्र या तंत्रज्ञानाचा वापर नैतिकता, गोपनीयता आणि मानवी मूल्ये जपत केला तरच त्याचे फायदे समाजाला दीर्घकाळ लाभदायक ठरतील असे मत मा. अमोलराव मोरे यांनी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शुक्रवार २ जानेवारी रोजी आयोजित शिक्षणमहर्षी तात्यारावजी मोरे यांच्या स्मरणार्थ आयोजित शिक्षणमहर्षी तात्यारावजी मोरे आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. या प्रसंगी मा. भानुदासराव माने, मा. रामराव इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती.निजामी राजवटीमध्ये मराठवाड्यातील ग्रामीण भागात शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणारे शिक्षणमहर्षी तात्यारावजी मोरे यांच्या शैक्षणिक कार्याला उजाळा मिळावा आणि विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व आणि नेतृत्व गुण विकसित व्हावेत यासाठी विविध सामाजिक विषयावर विचारमंथन घडवून आणण्याच्या हेतूने या आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले जाते.यावर्षीच्या एकेचाळिसाव्या वर्षातील स्पर्धेसाठी "कृत्रिम बुद्धिमत्ता युवा पिढीच्या बौद्धिक विकासासाठी तारक आहे/नाही" या ज्वलंत विषयावर आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत सोलापूर, धाराशिव, लातूर आणि बीड या चार जिल्ह्यातील पंधरा संघांनी आपला सहभाग नोंदविला.या स्पर्धेत लातूर येथील दयानंद विधी महाविद्यालयाच्या पात्रुडकर कस्तुरी व आदिती ढगे यांच्या संघाने प्रथम पारितोषिक रुपये दहा हजार एक, स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र तर छत्रपती शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय बलसुर येथील प्रगती औसेकर आणि भालेराव राणी यांच्या संघाने सांघिक द्वितीय पारितोषिक रुपये सात हजार एक व प्रमाणपत्र पटकाविले. श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय उमरगा येथील श्रद्धा खटके यांना वैयक्तिक तीन हजार रुपयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.भारत शिक्षण संस्थेचे सहचिटणीस मा. डॉ. सुभाष वाघमोडे यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. बक्षीस वितरणाचे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञांनामुळे नोकऱ्या कमी होण्याची भीती नसून नोकऱ्या निर्माण कशा होतील याकडे विद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे असे प्रतिपादन केले.स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. सुधीर मठपती, डॉ. राम कदम, प्रा. परमेश्वर सूर्यवंशी आणि श्री राजेश्वर वाघमारे यांनी काम पाहिले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले, प्रभारी प्राध्यापक डॉ. अशोक पदमपल्ले, उपप्राचार्य जी. एस. मोरे, पर्यवेक्षक शैलेश महामुनी, संयोजन समितीचे प्रमुख डॉ. विनोद देवरकर, डॉ. चंद्रसेन करे, डॉ. सन्मुख मुच्छटे, डॉ. व्ही. एम. गायकवाड, प्रा. अनंत कसगीकर, डॉ. व्ही. एम. गायकवाड, प्रा.महेश माकणिकर, प्रा. एम. डी. साळुंके, डॉ. प्रवीण जवळगेकर, प्रा. बी. व्ही. मोरे, प्रा. सूरज सूर्यवंशी आणि प्रा. एस. बी. कल्हाळीकर महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रदीप पाटील यांनी तर डॉ. विनोद देवरकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## साऊची वाट

धर्माआड सत्तेचा खेळ — त्यांना नको नमन
संसदेत निर्णय हवेत — समतेचं सूत्र स्पष्ट
जात, वर्ग, पितृसत्तेच्या बेड्या तोडणारा
माणूसपण जागवणारा — क्रांतीचा हुंकार हवा

शाळा उघडणं म्हणजे भिंती उभारणं नव्हे
अंधाराला छेद देणं हीच विद्येची ओळख
ज्ञान जर नम्र नाही तर ते सत्तेचं साधन
शोषितांच्या हातात हवं — मुक्तीचं अस्त्र

देवी करून बाईच माणूसपण हिरावलं
घराच्या चौकटीत तिचं आकाश कोंडलं
साऊ म्हणाली — “उभं राहा, बोला निर्भय”
भीती मोडली की जन्मतं खरं प्रखर स्वातंत्र्य

जात ही जन्माची नव्हे — सत्तेची साखळी
ती तोडली नाही तर लोकशाही ठरते फसवी
धर्म जर अन्याय शिकवतो तर तो बदलावा
सत्यधर्म हाच खरा — हे ठसवून जगवावा

शिक्षण म्हणजे विवेक जागवणारी चळवळ
अन्यायाला प्रश्न विचारणारी जिवंत मशाल
जो विवेक पेटवतो, तोच सत्यशोधक
तोच समाज घडवणारा - परिवर्तनाचा मार्गदर्शक

मौनातून अन्यायाला रोज खतपाणी मिळतं
आवाज फुटला की सत्तेचं सिंहासन हलतं
साऊची वाट म्हणजे भिडणारी निर्भय पाऊलवाट
जिथे अन्याय तिथे उभं राहणं — हाच खरा पाठ

धर्माआड सत्तेचा खेळ - त्यांना नको नमन
इतिहास जपू नका - त्याला निर्भय आव्हान द्या
साऊचा विचार जगा - उभा करा नवीन समाज
सत्य, न्याय, माणूसपण - हीच खरी क्रांतीची वाट

**प्रभाकर गायकवाड**
छत्रपती संभाजीनगर

## सावित्री माय

अनंत अडचणीवर
आयुष्यभर केलीस मात
स्त्रीशिक्षणाची सतत
पेटविलीस तू ज्योत

शिक्षणाचे दिलेस तू
धारदार शस्त्र हाती
पिडीत स्त्रीयासोबत
जोडून अतूट नाती

संकटाचा चढूनी घाट
लढलीस तू न्याय हक्कासाठी
बंदीस्त - शोषीत स्त्रीयांची
झालीस न्यायाची काठी

चिखल माती झेलूनी
जिवाचे केले रान
भारतीय पहिल्या शिक्षकेचा
मिळाला तुला बहुमाण

सावित्री माय तुझें
गावे किती गुणगाण
तुझ्यामुळेच मिळाला
स्त्रीजातीला आज सन्मान



**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903



जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३ जानेवारी २०२६


## सुईच्या टोकाशी

सुईच्या टोकाशी स्वप्नं टांगलेली
गाठ उसलेली आयुष्याची

उसवता धागा सोसतोय टाका
मार हा मुका ठरलेला

नव्या कापडास रोजच शिवणं
ठिगळाचं जीणं लिहिलेलं
पायपेटीवर रोजचीच टाच
फुटकीच काच संसाराची

जरी जीवनाची झालीय आबाळ
शिवतो आभाळ फाटलेलं

काळ बदलता युग रेडीमेड
जगण्याची नड रोजचीच

असा हा टेलर बाप पांडुरंग
घामाचा सुगंध घरभर



**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड

## मित्रा

नसेन मी या जगात तेव्हा
कदाचित श्रद्धांजलीचा
महापूर येऊन जाईल
कौतुकाचे गोडवे गाण्यासाठी
हजारो मित्रांचा
लोटून दिलेला महासागर......

कोणी हजेरी लावील
कोणी असण्याचा भास निर्माण करेल
तर कोणी गर्दी पाहण्यासाठी सुद्धा...

पण तुझ्यासारखा
जिव लागणारा मित्र
अंतिम दर्शनासाठी
आतुर झालेला असेल
डोळ्यातील आसवांना
वाट मोकळी करून देत....

माझ्यासाठी केविलवाना
झालेला चेहरा
तुला समजाविण्यासाठी
आतुरलेली जीभ
निशब्द झालेली असेल
तुला पाहण्यासाठी
आसूसलेले डोळे
तेव्हाच बंद झालेले असतील...

त्या बाजार गर्दीमध्ये
कोणी हसतील
कोणी रडतील
कोणी आक्रंदनही करतील
आजच्या त्याच्या सवडी प्रमाणे
व्यक्तही होतील...

मग लागतील
पेपरच्या बातम्यांचे ढीग
जो तो भरभरून लिहिलं
तेंव्हा ना मी ऐकायला असेन
ना पाहायला
ना वाचायला
म्हणून म्हणतो मित्रा
गोड बोलून घे
मनसोक्त हसून घे
मस्तपैकी भेटूनही घे
कारण उद्याचे दिवस
पाहिलेत कोणी.......

ऊडूदेत शब्दांचे फुलोरे
रंग गगनी पसरू दे
हसून एकदा मित्रा
तुझे स्माईल मित्रांसाठी
असे वरदान ठरु दे.

**भूमिपुत्र वाघ.**

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले : मानवतेची तेजस्वी मशाल

**भा**रतीय समाजाचा इतिहास हा केवळ राजकीय सत्तांतरांचा किंवा युद्धांच्या पराभव-विजयांचा इतिहास नाही, तर तो माणसाने माणसावर लादलेल्या अन्यायकारक सामाजिक रचनेचा आणि त्या रचनेविरुद्ध उभ्या राहिलेल्या मानवी संघर्षांचा दीर्घ इतिहास आहे. या इतिहासात अनेक राजे, योद्धे आणि विचारवंत आढळतात; मात्र ज्यांनी समाजाच्या मुळावरच प्रहार करून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला, अशी व्यक्तिमत्त्वे तुलनेने कमी आहेत. अशा दुर्मीळ, तेजस्वी आणि क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वांमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ३ जानेवारी १८३१ रोजी जन्मलेल्या सावित्रीबाई फुले या केवळ भारतातील पहिल्या महिला शिक्षिका नव्हत्या, तर त्या शिक्षण, समता, स्त्रीमुक्ती, दलितोद्धार आणि मानवमूल्यांच्या रक्षणासाठी आयुष्यभर झगडणाऱ्या महान समाजसुधारक होत्या. त्यांच्या जीवनाचा प्रत्येक क्षण हा अन्यायाविरुद्धचा संघर्ष आणि मानवतेच्या बाजूने उभा राहिलेला साक्षात्कार होता.सावित्रीबाई फुले ज्या सामाजिक वातावरणात जन्माला आल्या, ते वातावरण अत्यंत प्रतिगामी, विषम आणि अमानवी होते. जातिभेद हा समाजव्यवस्थेचा कणा मानला जात होता. जन्मावर आधारित श्रेष्ठ-कनिष्ठतेचे नियम इतके कठोर होते की माणसाच्या आयुष्याची दिशा त्याच्या जन्मानेच ठरवली जात होती. अस्पृश्यतेच्या नावाखाली समाजातील मोठ्या वर्गाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकारच नाकारला गेला होता. स्त्री ही पुरुषाची मालमत्ता समजली जात होती. शिक्षण, स्वातंत्र्य, मतप्रदर्शन आणि निर्णयक्षमता या गोष्टी स्त्रीसाठी निषिद्ध मानल्या जात होत्या. बालविवाह, बहुपत्नीत्व, विधवांचे केशवपन, धार्मिक अंधश्रद्धा, सामाजिक बहिष्कार आणि मानसिक छळ या प्रथा समाजमान्य होत्या. अशा परिस्थितीत जन्म घेऊनही सावित्रीबाई फुले यांनी या व्यवस्थेला निमूटपणे स्वीकारले नाही, तर तिच्या विरोधात उभे राहण्याचे अपूर्व धैर्य दाखवले.महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासोबतचा सावित्रीबाईंचा जीवनप्रवास हा केवळ पती-पत्नीचा सहवास नव्हता, तर तो विचारसमानतेवर आधारित सामाजिक संघर्षाचा सहप्रवास होता. ज्योतिराव फुले यांनी सावित्रीबाईंना शिक्षण दिले आणि समाजपरिवर्तनाची दृष्टी दिली. त्या काळात स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे समाजाच्या रूढींना उघड आव्हान देणे होते. शिक्षण घेतल्यानंतर सावित्रीबाईंनी हे स्पष्टपणे ओळखले की शिक्षणाशिवाय समाजातील शूद्र-अतिशूद्र, दलित आणि स्त्रिया कधीही मानसिक गुलामगिरीतून मुक्त होऊ शकणार नाहीत. शिक्षण हे केवळ अक्षरज्ञान नसून ते माणसाला विचारशील, विवेकी आणि स्वाभिमानी बनवते, हा विचार त्यांच्या संपूर्ण कार्याचा पाया ठरला.१८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी सुरू झालेली पहिली शाळा ही भारतीय समाजाच्या इतिहासातील एक क्रांतिकारी घटना होती. ही शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारी संस्था नव्हती, तर ती पितृसत्ताक, जातीय आणि स्त्रीद्वेषी व्यवस्थेविरुद्ध उघड केलेले बंड होते. सावित्रीबाई दररोज शाळेत जात असताना त्यांना समाजाच्या तीव्र विरोधाला सामोरे जावे लागत असे. रस्त्यात त्यांच्या अंगावर शेण, चिखल, दगड फेकले जात. त्यांना अपमानास्पद शिव्या दिल्या जात. मात्र या सर्व अपमानांना सामोरे जात असतानाही त्यांनी शिक्षणाचा मार्ग कधीही सोडला नाही. त्यांच्या पिशवीतील अतिरिक्त साडी ही त्यांच्या चिकाटीचे, धैर्याचे आणि मानवतेवरील अढळ विश्वासाचे प्रतीक बनली.सावित्रीबाई फुले यांचे शिक्षणकार्य केवळ उच्चवर्णीय समाजापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी शूद्र-अतिशूद्र, दलित आणि वंचित समाजातील मुला-मुलींसाठी शाळा सुरू करून शिक्षणावर असलेली जातीय मक्तेदारी मोडून काढली. समाजाच्या तळागाळातील घटकांना शिक्षणाची संधी मिळणे हीच खरी सामाजिक क्रांती आहे, हा विचार त्यांनी कृतीतून सिद्ध केला. शिक्षणामुळे माणूस प्रश्न विचारायला शिकतो, अन्याय ओळखतो आणि स्वतःच्या हक्कांसाठी उभा राहतो, हे त्यांनी समाजासमोर ठामपणे मांडले.स्त्रियांच्या सामाजिक स्थितीबाबत सावित्रीबाई फुले यांची भूमिका अत्यंत प्रगत, मानवतावादी आणि काळाच्या पुढची होती. त्या काळात स्त्रीला दुय्यम, दुर्बल आणि परावलंबी मानले जात असताना सावित्रीबाईंनी स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व, विचारशक्ती आणि आत्मसन्मान असलेला मानव म्हणून पाहिले. स्त्रीशिक्षणाशिवाय समाजाचा सर्वांगीण विकास शक्य नाही, हे त्यांनी आपल्या लेखनातून आणि कार्यातून समाजासमोर मांडले. शिक्षित स्त्री ही केवळ स्वतःचेच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाचे आणि पुढील पिढ्यांचे भविष्य घडवते, हा विचार त्यांनी समाजमनात रुजवण्याचा प्रयत्न केला.विधवांच्या प्रश्नांवर सावित्रीबाई फुले यांनी घेतलेली भूमिका त्यांच्या सामाजिक संवेदनशीलतेचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्या काळात विधवांचे जीवन अत्यंत अमानवी होते. केशवपन, रंगीत वस्त्रांवर बंदी, धार्मिक बंधने, सामाजिक बहिष्कार आणि मानसिक छळ या साऱ्या गोष्टी विधवांच्या नशिबी होत्या. सावित्रीबाईंनी या प्रथांचा तीव्र विरोध केला. त्यांनी विधवांसाठी आश्रयगृहे सुरू केली आणि त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, यासाठी समाजाशी संघर्ष केला. विधवा म्हणजे पापी किंवा समाजावर ओझे नसून तीही एक पूर्ण मानव आहे, हा विचार त्यांनी समाजासमोर ठामपणे मांडला.विधवांच्या आयुष्यातील सर्वात भीषण समस्या म्हणजे सामाजिक भीतीमुळे होणाऱ्या बालहत्या. अवैध गर्भधारणेमुळे अनेक विधवांना नवजात बालकांचा बळी द्यावा लागत असे. या अमानुष प्रथेविरुद्ध सावित्रीबाई फुले यांनी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. येथे विधवांना सुरक्षित वातावरणात प्रसूती करता येत असे. हा उपक्रम म्हणजे केवळ समाजसुधारणा नव्हे, तर तो मानवी करुणेचा आणि मातृत्वाच्या सन्मानाचा सर्वोच्च आविष्कार होता.अस्पृश्यता निर्मूलनासाठी सावित्रीबाई फुले यांनी उचललेली पावले त्या काळात अत्यंत धाडसी आणि क्रांतिकारी होती. अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठ्यांवर पाणी घेण्यास मनाई असताना त्यांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला केला. ही कृती म्हणजे सामाजिक समतेचा आणि मानवतेचा जाहीरनामा होता. त्यांनी कृतीतून दाखवून दिले की माणसाची ओळख त्याच्या जातीवर नव्हे, तर त्याच्या माणूसपणावर आधारित असली पाहिजे.सावित्रीबाई फुले या केवळ समाजसुधारक नव्हत्या, तर त्या एक संवेदनशील कवयित्री, लेखिका आणि विचारवंतही होत्या. त्यांच्या "काव्यफुले" या काव्यसंग्रहातून त्यांनी अज्ञानाविरुद्धचा आक्रोश, स्त्रीदुःख, सामाजिक विषमता आणि शिक्षणाचे महत्त्व प्रभावी शब्दांत मांडले. त्यांचे साहित्य हे सामाजिक क्रांतीचे शब्दरूप होते. त्यांच्या कवितांमधून समाजाला आत्मपरीक्षणाची प्रेरणा मिळाली. १८९७ साली पुण्यात प्लेगची भीषण साथ पसरली असताना सावित्रीबाई फुले यांनी मानवतेचा सर्वोच्च आदर्श घालून दिला. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्यांनी रुग्णांची सेवा केली. एका आजारी मुलाला वाचवताना त्यांना प्लेगची लागण झाली आणि त्यातच त्यांचे निधन झाले. मानवतेसाठी जगणे आणि मानवतेसाठीच प्राण अर्पण करणे हे त्यांच्या जीवनाचे अंतिम सत्य ठरले.आज सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करताना केवळ औपचारिक कार्यक्रम, भाषणे किंवा प्रतिमा पूजन पुरेसे नाही. त्यांच्या विचारांचा, मूल्यांचा आणि सामाजिक कार्याचा आशय आत्मसात करून तो आजच्या समाजात प्रत्यक्ष कृतीत उतरवणे हीच खरी आदरांजली ठरेल. आजही स्त्रीशिक्षण, लिंगभेद, जातीय विषमता, सामाजिक अन्याय आणि आर्थिक असमानता या समस्या विविध स्वरूपात अस्तित्वात आहेत. अशा वेळी सावित्रीबाई फुले यांचे विचार अधिकच मार्गदर्शक ठरतात.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या केवळ इतिहासातील व्यक्ती नाहीत, तर त्या वर्तमान आणि भविष्याला दिशा देणारी प्रेरणास्रोत आहेत. त्यांनी पेटवलेली शिक्षणाची, समतेची आणि मानवतेची मशाल आजही समाजाला प्रकाश दाखवत आहे. त्या मशालीचा प्रकाश समाजाच्या प्रत्येक कोपऱ्यात पोहोचवणे, हीच त्यांच्या जयंतीनिमित्त खरी मानवंदना ठरेल.




**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल - bagate.rajendra5@gmail.com



प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.





बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903